# गो.से. अर्थवाणिज्य महाविद्यालय नागपूर

## "राष्ट्रीय सेवा योजना पथक"

# कार्यक्रम अहवाल

## २०२१-२२

राष्ट्रीय सेवा योजना समिती अध्यक्ष व मा. प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी सत्र २०२१-२२ साठी राष्ट्रीय सेवा योजना समितीची स्थापना खालील प्रमाणे केली.

| | |
|---|---|
| • प्रा. डॉ. ए. बी. पटले (सेवानिवृत्त दि. ३१/१२/२०२१) | कार्यक्रम अधिकारी (३१/१२/२०२१ पर्यंत) |
| • प्रा. डॉ. वाय. एस. केदार | कार्यक्रम अधिकारी (१/१/२०२२ पासुन पुढे) |
| • प्रा. पल्लवी श्रीवास्तव | महिला कार्यक्रम अधिकारी |
| • प्रा. डॉ. एम. आर. पांडे | सहायक कार्यक्रम अधिकारी |
| • प्रा. डॉ. बी. एस. चचाने | सदस्य |
| • प्रा. डॉ. प्रिया मुरारकर | सदस्य |
| • प्रा. डॉ. राशी अरोरा | सदस्य |

राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे सत्र २०२१-२२ हया शैक्षणिक सत्रात पुढील प्रमाणे नियमित कार्यक्रम राबविण्यात आले.

**१) कोव्हीड-१९ वर उपाय म्हणून रासेयो व्दारे राबविण्यात आलेले उपक्रम :-** कोरोना व्हायरस पासून बचावासाठी आमच्या राष्ट्रीय सेवा

योजना पथकाव्दारे अनेक लोकोपयोगी व समाजउपयोगी व देशोपयोगी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आलेत.

**A**) कोरोना महामारीपासुन बचावासाठी मास्क वापरणे, साबुन किंवा सॅनिटायझर ने हात धुणे आवश्यक आहे अशाप्रकारची माहिती Online पध्दतीने मॅसेज, पोस्टर व व्हिडीओच्या मार्फत रोज प्रसारित करण्यात येत होते.

**B**) गरजू व गरीब लोकांना मास्क व सॅनिटाइझर चे वापर करण्यात येत होते.

**C**) **कोरोना लसीसंबंधी जनजागृती :-** कोरोना ला आळा घालायचा असेल तसेच त्याचेवर पूर्णपणे विजय मिळवायचा असेल तर कोरोना वॅक्सीनचे 100% लसीकरण झाले पाहिजे. परंतु कोरोना लसीबाबत समाजातील लोकांमध्ये अनेक भ्रम होते व आजही आहेत. ते दूर करण्यासाठी महाविद्यालयाच्या रासेयो समितीकडून सेमीनार घेण्यात आले. तसेच त्यांच्या शंकाचे निराकरण करण्यात आले. व पोस्टर, मॅसेज व व्हिडीओच्या मार्फत लोकांमधील व्याप्त भ्रम दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आले व आजही कोरोना लसीबाबतची जनजागृती सुरू आहे.

**D**) **मातृसंस्था शिक्षा मंडळ वर्धा व्दारे मोफत कोरोना लसीकरण :-**

आमची मातृ संस्था शिक्षा मंडळ, वर्धा व बजाज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गो.से.अर्थवाणिज्य महाविद्यालय, नागपूर मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच आमच्या महाविद्यालयाचे कर्मचारी प्राध्यापकांसाठी व त्यांचे कुटुंबीयांसाठी मोफत कोरोना

लसीचे व्यवस्था करण्यात आली. यात अनेक विद्यार्थ्यांनी तसेच कर्मचारी व प्राध्यापकवर्ग त्यांचे कुटुंबियांनी कोरोना लसीचा लाभ घेतला. याच्या जनजागृतीचे कार्य महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी केले.

**<u>इतर दिवसांचे कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. :-</u>**

**२) विश्व तंबाखु निषेध दिवस :-** दि. ३१/५/२०२१ रोजी गो.से अर्थ वाणिज्य महाविद्यालयाचे रासेयो विभागातर्फे विश्व तंबाखु निषेध दिवसाचे कार्यक्रम ऑनलाइन पध्दतीने आयोजित करण्यात आले होते. ह्याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले यांनी मार्गदर्शन केले तसेच रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.पल्लवी श्रीवास्तव यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी ५० रासेया स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**३) विश्व पर्यावरण दिवस कार्यक्रम :-** दि. ३/६/२०२१ ला रासेयो विभागातर्फे विश्व पर्यावरण दिवसाचे औचित्य साधुन कार्यक्रम घेण्यात आले. याप्रसंगी विशेष दिवस आयोजन समिती प्रमुख डॉ. नेहा कल्याणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.पल्लवी श्रीवास्तव यांनीही पर्यावरणसंबंधी विस्तृत माहिती देवून विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. प्रा. डॉ.ए.बी.पटले रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे संरक्षण करण्याचे आव्हान केले.

**४) सामाजिक जबाबदारी व नेतृत्वाची भुमिका :-** दि. ४/६/२०२१ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या NSS Cell व्दारे कोव्हीड-१९ काळात व्यक्तिची सामाजिक जबाबदारी व नेतृत्वाची

भूमिका कार्यशाळा मध्ये आमच्या २५ रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**५) शिवस्वराज्य राज्यभिषेक कार्यक्रमामध्ये सहभाग :-**

दि. ६/६/२०२१ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाव्दारे आयोजीत शिवस्वराज्य राज्यभिषेक दिवस कार्यक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयातील रासेयोनाच्या ११ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**६) महाविद्यालयात शिवस्वराज्य राज्यभिषेक दिवस कार्यक्रमाचे आयोजन :-** दि. ६/६/२०२१ ला महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे शिवस्वराज्य राज्यभिषेक कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले होते. हयाप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवस्वराज्यासंबंधी ची माहिती बी.कॉम. कोर्स चे संयोजक डॉ. विशाल ठणगन, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी यांनी केले तसेच स्वराज्य राज्यभिषेक संबंधीची विस्तृत माहिती रासेयो संयोजक डॉ.ए.बी.पटले यांनी दिली. याप्रसंगी IQAC संयोजिका डॉ. रंजना साहु, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव उपस्थित होते. या कार्यक्रमात ५६ विद्यार्थी, महाविद्यालयीन प्राध्यापकवर्ग सहभागी झाले होते.

**७) योग दिवस :- दि. २१ जुन २०२१ रोज सोमवार :** गो.से अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये योग समिती, क्रिडा समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना समितीअंतर्गत २१ जुन २०२१ ला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये NSS चे जवळ जवळ ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून

योग शिक्षक प्रा. आशुतोष तिवारी यांनी योगासन आणि प्राणायमचे महत्व सांगीतले. वर्तमान कोरोना काळात व धकधकीच्या काळात योगासन किती महत्वाचे आहे, हे सांगीतले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी कोवीड-१९ नियमांचे पालन करून उपस्थित होते.

**८) पर्यावरण संरक्षण सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन : १ जुलै २०२१ रोजी**:- ''झाडे लावा, झाडे जगवा'' हा संदेश आणि याबरोबरच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' तुकोबाचा हा संदेश देण्यासाठी महाविद्यालयाच्या NSS विभागातर्फे 'वृक्ष संरक्षण व संवर्धन सप्ताह कार्यक्रम' Online पध्दतीने आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वर्तमान परिस्थिती आणि भविष्यासाठी झाडे किती महत्वाचे आहे याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले तसेच समिती सदस्य उपस्थितीत होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या घरी, शेतामध्ये, शासकीय किंवा सार्वजनिक ठिकाणी एक झाड अवश्य लावावे असे आव्हान करण्यात आले व या आव्हानाला विद्यार्थ्यांनी सकारात्मक समर्थन दिले.

**९) दि. ४/७/२०२१ पर्यावरण संरक्षण व संवर्धन सप्ताह कार्यक्रम :-** दि. ४/७/२०२१ ला रासेयो विभागातर्फे ऑनलाइन पध्दतीने पर्यावरण संरक्षण व संवर्धन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमात ९० रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग होता.

महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.पल्लवी श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले व या ग्लोबल वार्मींग च्या काळात पर्यावरण संवर्धनाची किती गरज आहे त्याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगीतले.

**१०) जागतिक लोकसंख्या दिवस : दि. ११ जुलै २०२१ रोजी :-** विशेष दिवस आयोजन समिती आणि 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाअंतर्गत ११ जुलै २०२१ ला 'जागतिक लोकसंख्या दिवस' Online माध्यमाने साजरा करण्यात आला. यामध्ये ''वाढत्या लोकसंख्येचे देशाच्या व समाजाच्या विकासात झालेल्या नकारात्मक परिणामाचे अध्ययन'', या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये Online वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये रितीक शिरभैये व सत्यम तिवारी ह्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम व व्दितीय स्थान पटकावले. कार्यक्रमात त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**११) विश्व युवक कौशल्य दिवस कार्यक्रमाचे आयोजन :-** दि. १५/७/२०२१ रोजी - भारत सरकार कौशल्य विकास मंत्रालय यांच्या निर्देशानुसार व जिल्हा युवक कौशल्य विकास कार्यालय, नागपूर च्या निर्देशानुसार महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ''युवक कौशल्य विकास'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्याप्रसंगी रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी उद्योजकता व कौशल्यविकास समितीचे संयोजक डॉ. मनोज पांडे यांनी कौशल्य विकास ची आवश्यकता व महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**१२) Online माध्यमाने 'जागतिक शांती दिवस' : दि. ६ ऑगस्ट २०२१ रोजी :** गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा

विभागा व्दारे Online माध्यमाने (Caampaining Against Nuclear Weapon Day) हा दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना Nuclear Weapon चे भीषण दुष्पपरिणाम काय होतात व येत्या भविष्यात काय होऊ शकतात याबद्दलची माहिती देण्यात आली.यापुढे अश्या घटनाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आपण सर्वांनी याच्या विरोधात सदैव उभे राहू असा संकल्प केला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले यांनी मार्गदर्शन केले आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शांततेचा संदेश दिला. या Online कार्यक्रमा मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा चे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**१३) "Fit Free India" कार्यक्रमाचे आयोजन :- (१३/८/२०२१) :-**

आझादी का अमृत महोत्सव या संकल्पने अंतर्गत आमच्या महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने "Fit Free India" या कार्यक्रमाचे आयोजन Online पध्दतीने दि. १३ ऑगस्ट २०२१ ला करण्यात आले. हया कार्यक्रमात महाविद्यालयाचे १० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**१४) स्वच्छता पखवाडा कार्यक्रम :- (१/८/२०२१ ते १५/८/२०२१) :-**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार दि. १/८/२०२१ ते १५/८/२०२१ पर्यंत ‘‘स्वच्छता पखवाडा’’ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या घरासमोरील परिसर, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करावी व ती नियमित

स्वरूपात सुरू ठेवावी असे आव्हान करण्यात आले. व रासेयो स्वयंसेवकांनी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

या दरम्यान प्रत्येक रासेयो विद्यार्थ्यांने आपल्या घरी, शेतामध्ये अथवा रस्त्याच्या कडेला किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी एक वृक्ष लावावे व त्याची फोटो रासेयो कार्यालयात पाठवावी अशी सुचना करण्यात आली होती. रासेयो विद्यार्थ्यांनी हया सुचनांचे पालन करून रासेयो स्वयंसेवकांव्दारे ४५ झाडे लावण्यात आली व त्याच्या संवर्धनाची जबाबदारी रासेयो स्वयंसेवकांनी स्वीकारली आहे.

**१५) स्वातंत्र दिवस कार्यक्रम : दि. १५ ऑगस्ट २०२१ रविवार :-**

‘स्वातंत्र्य दिन’ १५ ऑगस्ट २०२१ या दिवशी गो.से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये सकाळी ७.४५ वाजता झेंडा वंदन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत यांनी तिरंगा फडकविला व मानवंदना दिली. NSS विभागाचे स्वयंसेवकांनी आपआपल्या भागातील शाळा व इतर संस्थामध्ये उपस्थिती दर्शविली.

**१६) कोरोना योध्दा पुरस्कारामध्ये सहभाग :-**

दि. २८/८/२०२१ ला महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे ‘‘कोरोना योध्दा पुरस्कार’’ चे आयोजन वसंतराव नाईक शासकिय महाविद्यालय (मॉरीस कॉलेज), नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. हया प्रसंगी आमच्या महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवक सचिन रामसहाय साहू हया विद्यार्थ्यांना नागपूर जिल्हा (शहर) चे

‘‘कोरोना योध्दा’’ म्हणून माननीय उच्च शिक्षण मंत्री नामदार श्री उदयजी सामंत यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. ह्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे १० रासेयो स्वयंसेवक व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ए. बी. पटले सहभागी झाले होते.

**१७) शिक्षक दिवस कार्यक्रमाचे आयोजन :- ५ सप्टेंबर २०२१ रोजीः-** भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिवस ‘शिक्षक दिवस’ म्हणून साजरा करण्यात आला. सर्वपल्ली राधाकृष्णन अतिशय ‘‘प्रतिभावंत शिक्षक’’ म्हणून त्यांची ओळख होती. याप्रसंगी पल्लवी देवगिरीकर हिने शिक्षकांप्रती आपले मनोगत व्यक्त केले.

**१८) मार्गदर्शन आणि नियोजन सभेचे आयोजन : दि. १९/९/२०२१ :-** रासेयो च्या सर्व नवीन प्रवेशित स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शन व नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) काय आहे? आणि रासेयो चे उद्देश काय आहेत तसेच रासेयो पथक कशा प्रकारे कार्य करते? याची पूर्ण माहिती PPT व्दारे देवून नवीन रासेयो स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना विस्तृतपणे समजावून सांगण्यात आली. तसेच त्यांच्या मनामधील सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. आणि वार्षीक कार्यक्रमाची माहीती देवून वार्षिक कार्यक्रमांचे नियोजन सांगण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले आणि डॉ. एम. आर. पांडे, प्रा. पल्लवी श्रीवास्तव व इतर समिती सदस्यांची उपस्थिती होती.

**१९) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस :- २४ सप्टेंबर २०२१ रोजी** :- राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्थापना दिनानिमीत्त गो.से. अर्थवाणिज्य महाविदयालयाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने ‘‘आझादी का अमृत महोत्सव’’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये रा. से.यो. च्या १०७ विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले यांनी ‘‘आझादी का अमृत महोत्सव’’ यासंबंधी रासेयो स्वयंसेवकांना विस्तृत माहिती देवुन २०२१-२२ या सत्रात अनेक कार्यक्रमाचे आयोजन उपरोक्त शिर्षकाअंतर्गत करण्याचे ठरविण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी रा.से.यो. विभागाच्या कामाची प्रशंसा केली. राज्य स्तरीय कोरोना योध्दा पुरस्कार विजेता सचिन रामसहाय शाहु यांनी आपले अनुभव आणि रा.से.यो. चा प्रवास एका सामान्य विदयार्थ्यापासून राज्यस्तरीय उत्कृष्ठ स्वयंसेवकांपर्यंतचा प्रवास सांगितला आणि रा.से.यो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचे व त्यांचे संवर्धन करण्यासाठी रासेयो तर्फे त्यांना एक-एक झाड देण्यात आले. एकूण ७० झाडे विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरी, शेतामध्ये अथवा सार्वजनिक मोक्याचे ठिकाणी लावण्यासाठी देण्यात आले. यात आंबा, पाम, कडूनिंब, जांभूळ, चिकू इत्यादी झाडाचे वितरण करण्यात आले.

**२०)** Say No to Plastic **कार्यक्रमाचे चे आयोजन :- ३०/९/२०२१ रोजी गुरूवार ला ‘‘आझादी का अमृत महोत्सव’’ कार्यक्रम अंतर्गत ‘‘प्लॅस्टिक चा वापर थांबवा’’** (Say No to Plastic) ‘प्लास्टिक चा

निषेध’ या विषयावर Online माध्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हयाप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी समजावुन सागितली. व प्लॅस्टिक चा उपयोग करू नका असे आव्हान करण्यात आले. या सभेमध्ये Say No to Plastic संबंधी अनेक सूचनांची विस्तृत माहीती डॉ. ए. बी. पटले यांनी विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी या सुचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले.

**२१) <u>राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंत आणि लाल बहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम</u> :-**

दि. ०२ ऑक्टोबर, २०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांच्या हस्ते ‘‘राष्ट्रपिता महात्मा गांधी’’ आणि पूर्व प्रधानमंत्री ‘‘श्री. लालबहादूर शास्त्री’’ यांच्या फोटोला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. हयाप्रसंगी सर्व प्राध्यापकांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

**२२) नॅशनल युनिटी डे कार्यक्रमाचे आयोजन (दि. ३१/१०/२०२१) :-**

भारताचे पहिले गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती कार्यक्रम महाविद्यालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. वाय. खंडाईत, IQAC को-ऑडीनेटर डॉ. रंजना साहु, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी नॅशनल युनिटी डे बद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार रासेयो प्रमुख डॉ.नेहा कल्याणी यांनी केले. हयाप्रसंगी डॉ.ए.बी.पटले यांनी आपले विचार

व्यक्त केले. कार्यक्रमाला २० विद्यार्थी, सर्व प्राध्यापक वर्ग व कर्मचारी वर्ग कोरोना नियमांचे पालन करून सहभागी झाले होते.

**२३) संविधान दिवस कार्यक्रम :- दि. २६ नोव्हेबर २०२१ :-** दि. २६ नोव्हेबर २०२१ रोजी महाविद्यालयात रासेयो पथकाचे वतीने ‘‘संविधान दिवस’’ कार्यक्रम साजरा करण्यात आला. ह्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत, IQAC को-ऑर्डीनेटर डॉ. रंजना साहु, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आंदराजली अर्पित केली याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांनी उपस्थितीतांचे मार्गदर्शन केले. आणि संविधान उद्देशिका चे वाचन केले. याप्रसंगी राष्ट्रीय एकात्मता व अखंडता व निष्ठा जपण्याची शपथ घेण्यात आली. प्रा. डॉ. ए.बी. पटले यांनी संविधानाबद्दल आपले विचार व्यक्त केले.

**२४) Online माध्यमाने रेड रिबन क्लब अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन :-** ‘‘आझादी का अमृत महोत्सव’’ या शिर्षकाअंतर्गत दिनांक १ डिसेंबर २०२१ रोजी एच.आय.व्ही. एड्स या गंभीर आजाराबद्दल जन जागृती निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने RRC (Red Ribbon Club) च्या अंतर्गत Video च्या माध्यमाने जनजागृती करण्यात आली व Online माध्यमाने दि. १ डिसेंबर २०२१ ला कार्यक्रम घेण्यात आले. आणि यामध्ये एच.आय.व्ही. एड्स संबंधी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमात ९७ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव आणि विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद देवुन HIV Aids या गंभीर आजाराची सर्व माहिती जाणुन घेतली.

**२५) Online पध्दतीने अल्पसंख्याक अधिकार दिवस (दि. १८/१२/२०२१) :-** महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे दि. १८/१२/२०२१ ला राष्ट्रीय अल्पसंख्याक अधिकार दिवस Online पध्दतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी रासेयो संयोजक डॉ. ए. बी.पटले, यांनी रासेयो स्वयंसेवकांना अल्पसंख्याक अधिकार दिवसाचे महत्व सांगितले. आपण सर्वांनी संविधानाने दिलेल्या अधिकाराचे व कर्तव्याचे पालन करावे असे सांगितले याप्रसंगी ८६ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**२६) Online पध्दतीने सुशासन दिवस कार्यक्रम दि. २५/१२/२०२१ :-**

माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी बाजपेयी यांचा जन्मदिवस ‘‘सुशासन दिवस’’ म्हणून ऑनलाइल माध्यमाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना Online पध्दतीने सुशासन दिवसाची माहिती व्हिडीओ व्दारे व PPT व्दारे देण्यात आली.

**२७) रासेयो कार्यक्रम अधिकारी कार्यभार हस्तांतरण :-**

दि. ३१/१२/२०२१ ला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले यांची सेवानिवृत्ती होत असल्यामुळे त्यांच्या कडील रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांचा कार्यभार माननीय प्राचार्य डॉ.एन.वाय.खंडाईत यांच्या

सुचनेनुसार रासेयो समिती सदस्य व माजी रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. यशोदीप एच. केदार यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आले, आणि प्रा.डॉ. वाय.एच.केदार यांनी दि. ३१/१२/२०२१ ला रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांचे कार्यभार स्वीकारले.

प्रा. डॉ.ए.बी. पटले यांनी प्रा.डॉ.वाय.एच.केदार यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**२८) युवा दिवस कार्यक्रम :-** दि. १२/१/२०२२ रोजी महाराष्ट्र शासन पर्यावरण मंत्रालयाच्या निर्देशानुसार ‘‘माझी वसुंधरा’’ या कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांना व इतर विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहभागी करण्यात आले. तसेच प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनाही या कार्यक्रमात सहभागी करण्यात आले व माझी वसुंधरा प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले.

**२९) Online राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रम :- (दि. २५/१/२०२२)**

राष्ट्रीय सेवा योजना समितीतर्फे दिनांक २५/१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता Online माध्यमाने ‘‘राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला याप्रसंगी जिल्हा निवडणूक कार्यालय, नागपूर चे अधिकारी श्री. नितेश सोनोने साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी संभाव्य नवीन मतदारांना माहिती दिली की या कोरोना काळात आपण आपले नाव मतदार यादीत Online माध्यमाने कसे नोंदवू शकतो तसेच नावातील दुरूस्ती, मतदार यादीतुन नाव वगळणे, जोडणे तसेच विद्यार्थ्यांच्या इतर महत्वपूर्ण प्रश्नांचे उत्तर देवून त्यांच्या शंका व कुशंकाचे निराकरण केले व

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी Online माध्यमाने आपले नाव मतदार यादीत नोंदवावे असे आव्हान केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय.एच.केदार यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. या कार्यक्रमाला महिला अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव ह्या प्रामुख्याने उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांनी मोठया संख्येत उपस्थितीत राहुन कार्यक्रमाचा लाभ घेतला व मतदार यादीत नाव नोंदविण्यासंबंधी उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले.

**३०) गणतंत्र दिवस कार्यक्रमात सहभाग :- (दि. २६/१/२०२२)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा गणतंत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. WHO च्या नियमांचे पालन करून झेंडा वंदन कार्यक्रम करण्यात आला. झेंडा वंदन कार्यक्रम सकाळी ठिक ७.४५ वाजता करण्यात आले. या कार्यक्रमात प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि एनएसएस चे २५ विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांच्या हस्ते झेंडा फडकविण्यात आला. प्राचार्यांनी झेंडा वंदन करून उपस्थितीला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी यांनी केले. याप्रसंगी रासेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थितीत होते.

**३१) जागतिक महिला दिवस कार्यक्रम दि. ८/३/२०२२ :-** जागतिक महिला दिवस कार्यक्रमाचे औचित साधुन विशेष दिवस आयोजन समिती आणि रासेयो विभागातर्फे Online माध्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व महिलांबद्दल आदर, सन्मान करावा असे मनोगत

व्यक्त केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.वाय.एच.केदार उपस्थित होते.

**आभार :-** सत्र २०२१-२२ मध्ये कोरोना महामारीमुळे अधिकांश कार्यक्रम Online माध्यमाने घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध समाजोउपयोगी देशोपयोगी नियमीत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक आरती बिसेन, अपेक्षा हुमने, दिपाली दहीकर, सत्यम तिवारी, ऐश्वर्या राऊत, चांदनी पटेल, प्रतिक्षा खडसे, वैष्णवी दोडके, लखन रामटेके, सचिन साहू, रिशब बिसेन, गुनगुन पोरडीवार, श्वेता बोरकर, हर्षित कोल्हे यांचे सहकार्य लाभले.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पल्लवी श्रीवास्तव, तसेच समिती सदस्य डॉ. एम. आर. पांडे, डॉ. बि. एम.चचाने, डॉ. प्रिया मुरारकर, डॉ. राशी अरोरा, डॉ. ए.बी.पटले यांचे सहकार्य प्राप्त झाले. तसेच IQAC को-ऑर्डीनेटर डॉ. रंजना साहु, विशेष दिवस आयोजन समिती संयोजिका डॉ. नेहा कल्याणी, एन. सी. सी. प्रमुख डॉ. आशुतोष तिवारी, तांत्रीक विशेषज्ञ प्रा. आकाश जैन आपण संर्वांचे मी हार्दीक आभार व्यक्त करतो. तसेच उपरोक्त रासेयो कार्यक्रम माननीय प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत सर यांच्या मार्गदर्शनात, निर्देशनात, सहकार्याने आणि प्रेरणेमुळे, शांततेत आनंदी वातावरणात संपन्न झाले. त्याबद्दल प्राचार्य सरांचे हार्दिक आभार. **धन्यवाद.**

**दि. /८/२०२२**

**संयोजक** **अध्यक्ष/ प्राचार्य**

**डॉ. वाय.एच.केदार**
**राष्ट्रीय सेवा योजना समिती**

**डॉ. स्वाती कठाळे**
**राष्ट्रीय सेवा योजना समिती**